महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३१३ वे | दिनांक : १४/११/२०२६ | वार : शनिवार

मायक्रो फायनान्सच्या जाचामुळे शेतकऱ्याची आत्महत्या? कंपन्यांवर कारवाईचा इशारा



अमरावती : मायक्रो फायनान्स कंपनीच्या कर्जाचा बोजा आणि वसुलीसाठी लावण्यात आलेल्या तगाद्याला कंटाळून एका 45 वर्षीय शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील सावंगा गुरव येथे घडली आहे. संदीप अवधूत करडे (रा. शिलोड) असे या शेतकऱ्याचे नाव असून, या घटनेमुळे सावंगा गुरवसह शिलोड परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. या धक्कादायक घटनेची दखल घेत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांना धमकावणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. कर्जाचे तीन हप्ते थकल्याने टोकाचे पाऊल प्राप्त माहितीनुसार, संदीप करडे यांची शिलोड येथे अंदाजे एक हेक्टर शेती होती. त्यांच्यावर एका मायक्रो फायनान्स कंपनीचे सुमारे दीड लाख (1,50,000) रुपयांचे कर्ज होते. आर्थिक विवंचनेमुळे त्यांना या कर्जाचे सलग तीन हप्ते भरता आले नव्हते. कर्जाचे हप्ते थकल्यामुळे कंपनीकडून सुरू असलेला वसुलीचा तगादा आणि वाढती आर्थिक अडचण यामुळे नैराश्येतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, अशी प्राथमिक चर्चा परिसरात सुरू आहे. मात्र, पोलिसांच्या अधिकृत तपासानंतरच आत्महत्येमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे. संदीप करडे यांच्या पश्चात त्यांची पत्नी उज्वला, 17 वर्षांची मुलगी, 12 वर्षांचा मुलगा आणि वृद्ध आई असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अशा अचानक जाण्याने करडे कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दोन अल्पवयीन मुलांचे भविष्य आणि वृद्ध आईच्या पालनपोषणाचा मोठा प्रश्न आता या कुटुंबासमोर उभा राहिला आहे. 'शेतकऱ्यांना धमकावणाऱ्यांवर कडक कारवाई करू' या घटनेवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त करताना ते म्हणाले, "हे जे लोक शेतकऱ्यांच्या मागे लागलेले आहेत, जे मायक्रो फायनान्सचे लोक शेतकऱ्यांना धमकीचे फोन करतायत किंवा त्यांना प्रेशराईझ करतायत, त्याची माहिती सरकारने किंवा प्रशासनाने तत्काळ घेतली पाहिजे. कलेक्टर, तहसीलदार, पंचायत, सरपंच, आमदार किंवा कुणाला तरी हे कळवले पाहिजे. अशा फायनान्स कंपन्यांवर आम्ही निश्चितपणे कडक कारवाई करू." त्यांनी या घटनेची गंभीर दखल घेतल्याचे स्पष्ट केले आहे.

शरद पवारांवरील संजय राऊतांच्या भूमिकेवर नवनाथ बन यांची टीका



मुंबई : राज ठाकरे यांनी छट पूजा उत्सवाला उत्तर प्रदेशच्या निवडणुकीचा रंग देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, राज ठाकरेंच्या माहितीसाठी सांगायचे तर, छट पूजा ही उत्तर प्रदेशचे लोक नव्हे, तर प्रामुख्याने बिहारचे लोक साजरी करतात, अशा शब्दांत भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. प्रत्येक गोष्टीकडे निवडणुकीच्या चष्म्यातून पाहण्याची सवय झाल्यानेच राज ठाकरे आणि मनसे छट पूजेला विरोध करत आहेत. आता उत्तर प्रदेशची निवडणूक आहे, बिहारची नाही, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. छट पूजा हा हिंदूंचा सण असल्याने त्याला राजकारणाचा रंग देऊ नये, असा टोलाही त्यांनी लगावला आहे. नवनाथ बन म्हणाले की, अजित पवार हे कधीही एनडीएमधून बाहेर पडणार नव्हते. उलट, महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होण्यापूर्वीच अजित पवारांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत शपथ घेतली होती. भाजपसोबत राहिले पाहिजे, ही भूमिका अजित पवारांची आधीपासूनच होती आणि त्यांनी ती शरद पवारांसमोर मांडली होती. त्यामुळेच २०१९ चा तो शपथविधी झाला होता, हे राऊत विसरले आहेत. अजितदादांच्या निधनानंतर त्यांच्याबद्दलचा अपप्रचार आता थांबवला पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेवर भाष्य करताना बन म्हणाले की, राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर जरी पडदा पडला असला, तरी ठाकरे गट कधी काँग्रेसमध्ये विलीन होणार आहे, हे संजय राऊत यांनी स्पष्ट केले पाहिजे. शरद पवार एनडीएसोबत येणार की वेगळी भूमिका घेणार, हे ठरवण्याचा अधिकार राऊतांना नाही; शरद पवार तो निर्णय घेण्यासाठी स्वतः सक्षम आहेत. तुम्ही मात्र उबाठाचे अस्तित्व संपवून काँग्रेसच्या दावणीला स्वतःला बांधून घेतले आहे. उद्धव ठाकरे काँग्रेसमध्ये जाणार, समाजवादी पार्टीमध्ये जाणार की एमआयएमसोबत जाणार, याचा निर्णय राऊतांनी जाहीर करावा, कारण उद्धव ठाकरेंच्या पक्षाचे निर्णय घेण्याची जबाबदारी राऊतांवर देण्यात आली असून, ते आता उबाठाचे 'प्रतिपक्षप्रमुख' झाले आहेत. महाराष्ट्राचा गुजरात होत असल्याच्या संजय राऊत यांच्या दाव्याचा समाचार घेताना नवनाथ बन म्हणाले की, वरळीतून आदित्य ठाकरेंच्या प्रचारादरम्यान 'केम छो वरळी' या घोषणेनेच झाली होती.

मुख्यमंत्र्यांनी आदेश द्यावेत, सतेज पाटलांचे साम्राज्य पाच मिनिटांत उद्ध्वस्त करतो





मुंबई : कोल्हापुरातील गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीवरून तापलेल्या राजकारणाचे पडसाद आता राज्य पातळीवर उमटताना दिसत आहेत. एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आमदार सतेज पाटील यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार निशाणा साधला. यावेळी त्यांनी आपल्या जुन्या घोषणेचा पुनरुच्चार करत, मुख्यमंत्र्यांनी मला आदेश द्यावेत, सतेज पाटलांचे साम्राज्य पाच मिनिटात उद्ध्वस्त करतो, हे विधान कायम ठेवले. तसेच, सतेज पाटील यांना कायद्यानेच वेसण घालणार असून, खासगी शिक्षणचालकांच्या मनमानी फी विरोधात लवकरच कायदा आणणार असल्याचेही चंद्रकांत पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीदरम्यान आणि त्यानंतर झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडीवेळी सतेज पाटील आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये जोरदार शाब्दिक चकमकी उडाल्या होत्या. या काळात दोन्ही बाजूंनी एकमेकांवर टोकाची टीका केली गेली. अखेर गोकुळच्या अध्यक्षपदी महायुतीचा संचालक विराजमान झाल्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी सतेज पाटील यांच्यावर जाहीररीत्या हल्लाबोल केला होता. त्याच राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आता चंद्रकांत पाटील यांनी पुन्हा एकदा कायद्याचा बडगा उगारण्याचा इशारा दिल्याने, या राजकीय वादाला नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले, अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी कोणी वाकडे बोलले तर सहन करणार नाही. त्यामुळेच सतेज पाटलांवर उद्ध्वस्त केल्याची टीका केली. खरे सांगायचे तर मी काही केले नाही, सुप्रीम कोर्टानेच शिक्षण संस्थाचालकांची झोप उडवली. एका विद्यार्थिनीच्या याचिकेनंतर कोर्टाने मोठी प्रश्नावली दिली आहे. त्यावर दिवाळी संपल्यानंतर उत्तर द्यावे लागणार आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठ चालकांची झोप उडणार आहे हे नक्की. पुढे बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले, एफआरए कायद्याची अंमलबजावणी होऊ नये म्हणून सतेज पाटील सातत्याने मुख्यमंत्र्यांची भेट घ्यायचे. येत्या मार्च महिन्यात एफआरए कायदा आणणार आहे. त्या माध्यमातून शिक्षणचालक विद्यार्थ्यांकडून जो फी घेतात त्यावर सरकारचे नियंत्रण असेल. कुठे मनमानी फी वसुली सुरू असेल तर त्यावर सरकार कारवाई करणार. डी वाय पाटील महाविद्यालयाचा सातबारा तपासा, तो कोणाच्या नावावर आहे हे समोर येईल, असे सांगत चंद्रकांत पाटील यांनी सतेज पाटलांना इशारा दिला आहे.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ नोव्हेंबर २०२६

दिवाळी शुभेच्छा उपक्रमाचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडून विशेष कौतुक



नाशिक : सण-उत्सवांच्या शुभेच्छा देण्यासाठी आज डिजिटल माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असताना, पत्रलेखनाची जुनी परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा सुंदर प्रयत्न मनपा शाळा क्र. ४९, पंचक येथील इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी केला. विद्यार्थ्यांनी दिवाळीनिमित्त राबविलेल्या 'पत्राद्वारे दिवाळी शुभेच्छा' या अनोख्या उपक्रमाची थेट राज्याचे शिक्षणमंत्री मा. ना. दादाजी भुसे साहेब यांनी दखल घेतली. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली शुभेच्छापत्रे पाहून त्यांनी शिक्षिका सौ. वैशाली शेवाळे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि शिक्षिकेच्या प्रयत्नांचे त्यांनी मनापासून कौतुक केले. 'विद्यार्थ्यांकडून असेच नावीन्यपूर्ण उपक्रम अपेक्षित आहेत. हा खूप छान उपक्रम आहे,' अशा शब्दांत त्यांनी या उपक्रमाला दाद दिली. तसेच शाळेला प्रत्यक्ष भेट देण्याची इच्छाही व्यक्त केली. राज्याच्या शिक्षणमंत्र्यांकडून मिळालेली ही कौतुकाची पावती विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरली.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी नाशिक महानगरपालिकेचे मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. शिक्षण सभापती, मा. आयुक्त तसेच मा. प्रशासनाधिकारी आणि विविध शिक्षकांना पोस्टाद्वारे दिवाळी शुभेच्छापत्रे पाठविली होती. चिमुकल्यांनी पाठविलेल्या या प्रेमळ शुभेच्छांना मान्यवरांनीही तितक्याच आपुलकीने प्रतिसाद दिला.नाशिक
महानगरपालिकेच्या महापौर मा. हिमगौरीताई आडके यांनीही, "चिमुकल्या हातांची प्रेमळ भेट! वर्गशिक्षिका व विद्यार्थ्यांनी आपुलकीने दिलेली ही दिवाळी भेट आनंद देणारी आहे. शाळेतील या बालगोपाळांचे प्रेम म्हणजेच खरी दिवाळी!" अशा शब्दांत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.शिक्षण सभापती मा. शरद मोरे यांनीही विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत हा उपक्रम 'स्तुत्य व अनुकरणीय' असल्याचे गौरवोद्गार काढले. प्रशासनाधिकारी यांनीदेखील विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. अनेक मान्यवरांनी या शुभेच्छापत्रांचे छायाचित्र आपल्या सोशल मीडिया खात्यांवरून शेअर करून या उपक्रमाची दखल घेतली. चिमुकल्यांच्या या सर्जनशील प्रयत्नांना मिळालेला हा प्रतिसाद शाळेसाठी अभिमानास्पद ठरला.मोबाईल आणि सोशल मीडियाच्या युगात प्रत्यक्ष पत्र लिहिण्याची सवय कमी होत चालली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना पोस्टकार्डची माहिती मिळावी, पत्रलेखनाचा अनुभव घेता यावा आणि स्वतःच्या भावना शब्दांतून व्यक्त करता याव्यात, या शैक्षणिक हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी स्वतः पोस्टकार्डवर आकर्षक पणत्यांची चित्रे काढून ती विविध रंगांनी सजविली. त्यासोबत दिवाळीच्या शुभेच्छा देणारे छोटे, सुंदर आणि अर्थपूर्ण संदेश लिहिले. अशा प्रकारे प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःच्या कल्पनेतून एक अनोखे शुभेच्छापत्र तयार केले. या प्रक्रियेत मुलांच्या चित्रकलेला, रंगसंगतीला आणि भाषिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळाले.या कृतीतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. पत्रलेखनाची प्राथमिक माहिती, छोटे संदेश तयार करण्याचे कौशल्य आणि स्वतःचे विचार व भावना व्यक्त करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. चित्रकला, रंगकाम, सजावट यांच्या माध्यमातून त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला आणि सर्जनशील विचारांना चालना मिळाली.शुभेच्छा देणे, इतरांचा आदर करणे, आभार व्यक्त करणे, आपुलकी जपणे आणि सामाजिक नातेसंबंध दृढ करणे अशा मूल्यांची रुजवणही या उपक्रमातून झाली. आपल्या हातून तयार झालेल्या शुभेच्छापत्रांचे मोठ्या मान्यवरांनी कौतुक केल्याने मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि काहीतरी वेगळे करण्याची प्रेरणा मिळाली.पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाल्यास शिक्षण अधिक आनंददायी, अनुभवसमृद्ध आणि कायमस्वरूपी लक्षात राहणारे ठरते, याची प्रचिती या उपक्रमातून आली. विस्मरणात जात असलेल्या पत्रलेखनाच्या माध्यमातून नव्या पिढीला संवाद, आपुलकी आणि संस्कारांची ओळख करून देणारा हा उपक्रम विशेष ठरला.उपक्रमाची संकल्पना व नियोजन सौ. वैशाली शेवाळे/भामरे यांनी केले. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक मा. दत्तात्रय सूर्यवंशी सर यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच सर्व शिक्षकवृंदांचे सहकार्य मिळाले.'आमचे विद्यार्थी, आमचा अभिमान!' या शाळेच्या ब्रीदवाक्याला साजेशा या उपक्रमाने चिमुकल्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ मिळवून दिले आणि दिवाळीच्या आनंदात प्रेम, कृतज्ञता व शिक्षणाचा सुंदर प्रकाश पसरविला.

'जयभीम'चे जनक बाबू हरदास एल. एन. ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचे थाटात प्रकाशन



नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) : कर्मवीर बाबू हरिदास आवळे स्मृती परिसर, आवळे चौक, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर येथे 'जयभीम'चे जनक बाबू हरदास एल. एन. या प्रा. डॉ. आशिष गजानन थुल लिखित ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन सोहळा नुकताच अतिशय उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भदन्त नागदीपांकर महाथेरो उपस्थित होते.यावेळी बोलताना प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे (मराठी विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ) यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत विश्वासू सहकारी म्हणून बाबू हरदास यांचे अल्पकाळात अत्यंत भरीव योगदान राहिले आहे. पीडब्ल्यूएस महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बाबू हरदास यांच्यावर ग्रंथ लिहून डॉ. आशिष थुल यांनी बाबुजींना खरी आदरांजली वाहिली असल्याचे मत व्यक्त केले. तर डॉ. पंकज मून यांनी या विषयावर अजूनही खोलात जाऊन अभ्यास करण्याची गरज प्रतिपादन केली. आंबेडकरी साहित्यकार प्रभाकर गजभिये यांनी मराठीतील हे प्रेरणादायी साहित्य हिंदी भाषेतही अनुवादित होणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगत विचार मांडले.अध्यक्षीय भाषणात भदंत नागदिपंकर यांनी, 'जयभीम'च्या जनकांचा हा बुलंद नारा आज जगभरात पोहोचला असल्याचे सांगितले. ग्रंथाचे लेखक प्रा. डॉ. आशिष थुल यांनी आपल्या मनोगतात, "बाबूजींच्या विचारांनी प्रेरित होऊनच माझ्या या ग्रंथाचा जन्म झाला असून, सलग तीन आवृत्त्यांना वाचकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे," असे भावपूर्ण उद्गार काढले.कार्यक्रमा दरम्यान ग्रंथाचे लेखक डॉ. आशिष थुल यांच्यासह 'जयभीम जनक बाबू हरदास एल.एन. गौरव समिती कामठी'च्या कश्यप भावे, इंदु मेंढे, प्रिती नगराळे, शुद्धमती शेंडे, लता भावे, प्रतिमा शेवाळे, अलका नगराळे व अनिरुद्ध शेवाळे यांचा विशेष सन्मान व सत्कार करण्यात आला.या सोहळ्यास डॉ. अनिरुद्ध शेवाळे, कृष्णराव मंडपे (अध्यक्ष, हरदास नगर अर्बन क्रेडिट को-ऑप. सो.), संघमित्राताई गेडाम यांच्यासह उमेश बोरकर, संजय फुलझेले, सुरेश पाटील, डॉ. संजय गजभिये, ई. मो. नारनवरे, संजय सोमकुंवर, नवनीत मोटघरे, शंकरराव ढेंगरे, भीमराव वैद्य, एन. टी. मेश्राम, नामदेव खोब्रागडे, प्रभाकर पानतावणे, नरेश वाहणे, राजकुमार वंजारी आदी मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आशिष थुल,संचालन विलास गजभिये , सुजाता मेश्राम यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे आयोजन बाबू हरदास एल.एन. बहुउद्देशीय संस्था (नागपूर), समूहघोष सामाजिक संस्था (नागपूर) आणि बाबू हरदास एल.एन. गौरव समिती (हरदास नगर, कामठी) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

जाहिरात दर

१.	पूर्ण पान (मल्टीकलर)	५०००/-
२.	अर्धे पान (मल्टीकलर)	३०००/-
३.	पाव पान (मल्टीकलर)	२०००/-
४.	शुभेच्छा जाहिरात	६००/-

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ नोव्हेंबर २०२६

डॉ. गौरव अरुणा श्रीकांत मिणियार 'एमएस ऑर्थोपेडिक्स' पदवीने सन्मानित; मुरूम येथे गौरव सोहळा संपन्न



मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : स्वप्न मोठं आणि मेहनत त्याहून मोठी... या जिद्दीच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणात उल्लेखनीय यश संपादन करत डॉ. गौरव अरुणा श्रीकांत मिणियार यांनी 'एमएस ऑर्थोपेडिक्स' ही उच्च पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. या यशामुळे मिणियार परिवार आणि संपूर्ण परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण असून, गुरुवारी (ता. 12) मुरूम येथील रत्नमाला मंगल कार्यालयात त्यांच्या गौरवार्थ एका दिमाखदार सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.नंदगावचे मठाधिपती राजशेखरजी महाराज यांच्या शुभहस्ते डॉ. गौरव मिणियार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ डॉ. राधाकृष्ण डागा, डॉ. शिवप्रसाद काबरा, डॉ. लिंबणाप्पा मुदकण्णा, डॉ. घनश्याम दरक (लातूर), श्यामसुंदर मिणियार, जमनाबाई मिणियार, डॉ. राधिका लाटी, डॉ. सुमित लाटी (छ. संभाजीनगर) उद्योजक मधुरजी जाकोटीया (मालेगाव), राधिका जाकोटीया, शोभा मिणियार, श्रीकांत मिणियार, अरुणा मिणियार, लीलावती मिणियार आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी अरविंद चौधरी, कल्लय्या स्वामी, डॉ. राधाकृष्ण डागा, डॉ. शिवप्रसाद काबरा, अशोक मिणियार, कुमारी तेजस्विनी मुदकण्णा, अमृता मिणियार आदींनी मनोगतातून डॉ. गौरव यांच्या कष्टाचे व यशाचे कौतुक केले. तसेच संपूर्ण मिणियार परिवाराने चित्रफितीद्वारे (व्हिडिओ) गौरवोद्गार व्यक्त केले.सत्काराला उत्तर देताना डॉ. गौरव मिणियार म्हणाले, "आमच्या मिणियार कुटुंबीयांनी जपलेली या पंचक्रोशीतील सामाजिक बांधिलकीची परंपरा मी पुढच्या काळातही तशीच जगेन आणि माझ्या वैद्यकीय सेवेतून कायम समाजसेवा करत राहीन." याप्रसंगी त्यांनी उपस्थितांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली.या भव्य सोहळ्यास माजी पंचायत समिती सभापती राजासाहेब पाटील, जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील, शिवसेना नेते चंद्रशेखर मुदकण्णा, महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे, व्यापारी नागरी पतसंस्थेचे चेअरमन उमेश कारभारी, ज्ञानदान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शरणाप्पा मुदकण्णा, माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे, रोटरीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सूत्रय्या स्वामी, प्रशांत मुदकण्णा, गुलाब डोंगरे, विष्णुदास मुंदडा, बालाप्रसाद काबरा, संजू मिणियार, रमेश मिणियार यांच्यासह वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, सहकार, राजकीय आणि पत्रकार क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी डॉ. गौरव यांना पुढील उज्ज्वल वाटचालीस भरभरून शुभाशीर्वाद दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती झंवर यांनी केले, तर श्रीकांत मिणियार यांनी आभार मानताना उपस्थितांची उपस्थिती हीच आमच्यासाठी प्रेरणादायी व अभिमानाची असल्याचे सांगितले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मुरूम येथील माहेश्वरी युवक मंडळ व माहेश्वरी प्रगती मंडळाने विशेष पुढाकार घेतला. कष्टाच्या जोरावर मिळवलेले हे यश परिसरातील तरुणांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत असून, सर्वच स्तरातून डॉ. गौरव मिणियार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील रत्नमाला मंगल कार्यालयात आयोजित डॉ. गौरव मिणियार यांचा सत्कार मठाधिपती राजशेखरजी महाराज यांच्या हस्ते करताना राधाकृष्ण डागा, शिवप्रसाद काबरा, लिंबणाप्पा मुदकण्णा, घनश्याम दरक, श्यामसुंदर मिणियार व अन्य.

मंदिराच्या दारात विटाळ

जिथे माझ्या स्पर्शाने विटाळ होतो,
तिथे माझ्या पायांनी जायचे तरी का?
जिथे माझ्या सावलीची भीती वाटते,
तिथे माथा टेकवायचा तरी का?

माझ्या हाताने दिलेले पाणी चालत नाही,
माझ्या हाताने बनवलेले अन्न चालत नाही,
माझी माणुसकी मान्य नाही,
मग देव तरी माझा कसा?

जिथे प्रवेशासाठी जात विचारतात,
तिथे भक्तीचा बाजार तरी कशाला?

जिथे माणसाला उंबरठ्यावर थांबवतात,
तिथे देवाच्या दर्शनाची ओढ तरी कशाला?
अपमानाच्या पायऱ्या चढून
स्वाभिमान कधीच मिळत नसतो!

मंदिरात प्रवेश नाकारता ना?
ठीक आहे!

आम्हीही आता
देवाच्या दारात जाणार नाही.
आम्हाला नको प्रसाद ,
नको आशीर्वाद,
नको देवाचा दाखला!

आम्हाला हवा आहे
माणूस म्हणून जगण्याचा अधिकार!
आमचा देव आमच्या माणुसकीत आहे,
आमची पूजा आमच्या कर्मात आहे,
आमचा धर्म समतेत आहे!

लक्षात असुदे ,
ज्या देवाच्या दारात माणसाला जात विचारली जाते,
त्या दारापेक्षा
माणसाच्या स्वाभिमानाचे आभाळ मोठे असते!

आम्ही तुमची श्रद्धा नाकारत नाही,
पण देवाच्या नावाखाली होणारा अपमान
नक्कीच नाकारतो!

डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजिओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ नोव्हेंबर २०२६

कठिन चीवर दान उत्सव



नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) : कठीण चीवर दान कार्यक्रम आयोजन करण्यात आले. परम पूज्यनीय भदंत आनंद थेरो आणि परम पूज्यनीय भदंत सुमेध नागरत्न थेरो यांचा वर्षावास लाभला. दि. 07 नोव्हेंबर ला संध्याकाळी 06 वाजता ढोल वाज्यासहित भव्य कठीण चीवर कापड मिरवणूक काढण्यात आली आणि रात्रभर कठीण चीवर शिवण्यात आला व परित्राण पाठ करण्यात आला. दि. 08 नोव्हेंबर रविवारी 2026 ला सकाळी 09 वाजता दान वस्तूंची (कठीण चीवर, कल्पतरू, धम्मपताका, अट्टपरिष्कार, चीवर, परिष्कार, बोधिवृक्ष, बुद्धमूर्ती, फळदान व भिन्न भिन्न दान वस्तू इत्यादी) ढोल तासे वाज्यासहित कठीण चीवर दान उत्सव मिरवणूक काढण्यात आली व दान वस्तूंचा गौरव करण्यात आले. ते सगळे दान परम पूज्यनीय भिक्खु संघाला दान करण्यात आले. भिक्खु संघाने दानानुमोदन पर धम्मदेशना केली. परम पूज्यनीय भदंत डॉ. सिलवंस महाथेरो, विहाराधिपती बोधिमग्गो महाविहार, इसासनी नागपूर यांनी दान-शील-भावना या त्रिविध पुण्य कर्मावर सुंदर अशी धम्मदेशना दिली. पूज्यनीय भदंत नागदीपंकर महाथेरो, संचालक समता सैनिक दल यांनी समाजाचे सण उत्सव परंपरा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणीनेच समाजाची उन्नती विकास आहे व बुध्दाचा सध्दम्मच आपला कल्याण साधू शकतो. मनुष्याच्या सर्वांगीण विकासासाठी 22 प्रतिज्ञाचे महत्व अतिआवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. पूज्यनीय भदंत डॉ.धम्मसेवक महाथेरो यांनी कठीण चीवर दान आणि त्याचे लाभ, फळ व दुःख मुक्ती प्रतिपादित केले. प्रास्ताविक भिक्खु सुमेध नागरत्न थेरो व संचालन पूज्यनीय श्रमण डॉ. शुभमचित्त यांनी केले. फोटो व व्हिडीओ सेशन शुभम वनकर साहेब यांनी केले. अत्यंत दर्शनीय मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमाला पूज्यनीय भदंत प्रियदर्शी महाथेरो, भदंत डॉ. धम्मसेवक महाथेरो, भदंत नागदीपंकर महाथेरो, डॉ. सीलवंस महाथेरो, भदंत ज्ञानबोधि महाथेरो, भदंत प्रा. अनिरुद्ध महाथेरो, भदंत संघकीर्ती महाथेरो, भदंत धम्मधर महाथेरो, डॉ. सारिपुत्त थेरो, ज्ञानबोधि थेरो, प्रज्ञावीर थेरो, धम्मवीर थेरो, रेवतधम्मो थेरो, जीवनदर्शी थेरो, सुमेध बोधि थेरो, भदंत सोन, भदंत यशवर्धन, भदंत शासन बोधि, भदंत विपस्सी, श्रमण धम्मसील व अन्य श्रमाणेर गण तसेच ज्ञानेश्वर मेश्राम, हर्षल मेश्राम, हर्ष नंदागवळी, मयूर मेश्राम, पौर्णिमा बागडे, विधी रामटेके, राशी पाटील, सौम्या, माही पाटील, समता रंगारी, सुनंदा रंगारी, प्रमिला मेश्राम, शकुंतला पाटील, सीमा मेश्राम, रंजना भोवते, प्रियंका गजभिये, प्रीती पाटील, अर्चना पाटील, मीनाक्षी वाघमारे, भूमिका रामटेके, रंजना मेश्राम, रत्नमाला कावळे, सुंदराआई मेश्राम, मधूबाला रामटेके, कल्पना बोरकर, बिना नगरारे, प्रतिभा रंगारी, वैशाली रंगारी, मीना पाटील, रवी मेश्राम, संदीप रंगारी,जितेंद्र मेश्राम, प्रा.डॉ. चंद्रशेखर पाटील, सुरेंद्र रामटेके, चंद्रभूषण मेश्राम व समस्त बौद्ध अनुयायी तसेच मिझोरम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, आसाम, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र राज्यातील विविध उपासक उपासिकानी व प्रतिनिधिनी उपस्थिती दर्शवीली.

अभंगांच्या स्वरांतून संतविचारांचा जागर; ‘अभंगायन महोत्सव २०२६’ उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर : संतसाहित्याचा समृद्ध वारसा, भक्तिरसपूर्ण अभंग आणि सुरेल वाद्यसंगतीचा अविष्कार घडविणारा ‘अभंगायन महोत्सव 2026’ उत्साहात संपन्न झाला. जिल्हा परिषद (शिक्षण विभाग), छत्रपती संभाजीनगर आणि सह्याद्री स्वर मंच प्रस्तुत या महोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी
उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे, मराठवाडा लिगल ॲण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा ॲड. डॉ. कल्पलता पाटील-भारस्वाडकर, ॲड. सुधीर पाटील, डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी प्रज्वल पौळ आणि सह्याद्री स्वर मंचचे अध्यक्ष विवेक ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.या महोत्सवात प्रा. शंकर विधाते आणि प्रा. गणेश कोटीये यांनी संतपरंपरेतील अभंगांचे सुमधुर गायन सादर केले. त्यांच्या स्वरांना तबल्यावर संदीप गुंजकर, संवादिनीवर दिनेश डोळे, पखवाजावर नंदकिशोर हातागळे, तानपुऱ्यावर कुलदीप काथार व हरिओम भोसले आणि टाळवादनावर भार्गव गुंजकर यांनी सुरेल साथ दिली. गायन आणि वाद्यसंगतीच्या सुंदर मिलाफामुळे मैफलीत भक्तिरसाची अनुभूती निर्माण झाली. कार्यक्रमाचे निवेदन शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप शिरसाट यांनी केले.यावेळी ॲड. डॉ. कल्पलता पाटील-भारस्वाडकर, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी प्रज्वल पौळ आणि उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे यांनी मनोगते व्यक्त केली. अभंगगायनाचा अत्यंत सुंदर आणि दर्जेदार कार्यक्रम सादर केल्याबद्दल त्यांनी गायक प्रा. शंकर विधाते, प्रा. गणेश कोटीये तसेच सर्व वादक व सहकलाकारांचे विशेष अभिनंदन केले. गायन आणि वाद्यसंगतीच्या सुरेख समन्वयातून साकारलेल्या या मैफलीने रसिकांना अविस्मरणीय सांगीतिक अनुभव दिल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली.दिवाळीच्या मंगलमय वातावरणात भक्तिसंगीताच्या माध्यमातून संतविचारांचा जागर घडविणारा हा महोत्सव रसिकांसाठी संस्मरणीय ठरला. महोत्सवाच्या यशस्वितेसाठी सह्याद्री स्वर मंच आणि जिल्हा परिषद शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

आग दुर्घटनेत मरण पावलेल्या कुटूंबास आर्थीक मदत



धाराशिव (प्रा. सुधीर पंचगल्ले) : येडशी येथील किराणा दुकानास आग लागून मरण पावलेल्या करंडे कुटूंबातील वारसांना शरण पाटील फाउंडेशन, मुरूम तर्फे 2 लाखाची आर्थीक मदत विधान परिषद आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आली. दि.09 नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास येडशी येथील गोविंद करंडे यांच्या किराणा दुकानाला व त्याच दुकानच्या वरच्या राहत्या घराला ऐन दिवाळीत शाॅट सर्किटमुळे आग लागल्याने करंडे कुटूंबातील उत्तम त्रंबक करंडे, चंद्रकला उत्तम करंडे (आजी आजोबा) गोविंद उत्तम करंडे व ज्योती गोविंद करंडे (पती पत्नी) आणि दिवाळीनिमित्त बाहेरगावातून आलेल्या सिध्दी गोविंद करंडे आणि गायत्री गोविंद करंडे या दोन मुलीसह 6 जणांचा मृत्यू झाला होता. या दूरघटनेतून सुदैवाने वाचलेला कृष्णा गोविंद करंडे,येडशीचे उपसरपंच पिंटु करंडे,यांना शरण पाटील फाउंडेशन, मुरूम यांच्याकडून 2 लाखाची आर्थीक मदत विधान परिषद आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आली. यावेळी.धाराशिव जिल्हा अनु.जाती.मोर्चाचे अध्यक्ष दिलीप भालेराव, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश आष्टे,जि.प.सदस्य दादा शितोळे पाटील,ओबीसी मोर्चा अध्यक्ष दादा घोडके, आशिष मोदाणी, सिध्दार्थ बनसोडे नगरसेवक, दर्शन कोळगे,कमलाकर पाटील, हरीभाऊ जाधव, धनंजय पाटील ,शशांक सस्ते,विजय सस्ते, प्रशांत पवार,संजय लोखंडे,निवासी जिल्हाधिकारी कडवकर, एस.डी.ओ.सौ मृणाल जाधव तहसीलदार आदि उपस्थित होते.

दिपावली चा आनंद हिरावला! निरगुडी परिसरातील लाभार्थी शासनाच्या आनंदाच्या शिध्यापासून वंचित

खुलताबाद (सनिराम गावंडे) : शासनाडून सर्वसामान्य नागरिकांना दिपावलीच्या , सणासुदीच्या काळात आनंद मिळावा, या उद्देशाने आनंदाचा शिधा वाटप योजना राबविण्यात येते. मात्र, यावर्षी निरगुडी परिसरातील दुष्काळाचे सावट असतांना देखील लाभार्थ्यांना अद्याप आनंदाचा शिधा मिळालेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.सणासुदीचे दिवस निघून गेले असताना आदिवासी दुर्गम भागात व निरगुडी बु/खु परिसरात गरीब व गरजू कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, शिधा वाटप झाला नसल्याने लाभार्थ्यांना दुष्काळाचे चटके सोसावे लागत आहे.शासनाच्या योजनेचा लाभ वेळेत मिळणार नसेल, तर या योजनेचा उद्देश काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.संबंधित रास्त भाव दुकानदार व पुरवठा विभागाने याकडे लक्ष देऊन आनंदाच्या शिध्याचे वाटप तातडीने सुरू करावे आणि पात्र लाभार्थ्यांना त्यांचा हक्काचा शिधा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निरगुडीच्या परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ नोव्हेंबर २०२६

चिमणी माणसाचा वारसा: डॉ. सलीम अली आणि आपल्या पंखधारी मित्रांचे संरक्षण

दरवर्षी १२ नोव्हेंबर रोजी भारत आपल्या एका महान संततीचे "डॉ. सलीम मोईजुद्दीन अब्दुल अली" यांचे रण करतो, ज्यांना प्रेमाने "भारताचे पक्षीमानव" (Birdman of India) किंवा "चिमणी माणूस" (Sparrow Man) असे म्हणतात. १८९६ मध्ये मुंबईत जन्मलेले डॉ. सलीम अली हे एक अग्रगण्य पक्षीशास्त्रज्ञ, निसर्गवादी आणि संवर्धनवादी होते, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य पक्ष्यांचा अभ्यास आणि संरक्षणासाठी समर्पित केले. त्यांची जयंती केवळ एका महान शास्त्रज्ञाचे स्मरण करण्याचा दिवस नाही; ती आपल्या शहरांत, नद्यांत आणि जंगलांत राहणाऱ्या पंखधारी मित्रांबद्दल आपली जबाबदारी जाणून घेण्याचा दिवस आहे. डॉ. सलीम अली हे संपूर्ण देशात प्रणालीबद्ध पक्षी सर्वेक्षण करणारे पहिले भारतीय होते. त्यांचे प्रसिद्ध पुस्तक "द बुक ऑफ इंडियन बर्ड्स" (१९४१) ने भारतीयांच्या पिढ्यांना पक्षीनिरीक्षणाचा आनंद शिकवला. ते बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) च्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावत होते आणि भारतपूर पक्षी अभयारण्य (केवलादेव राष्ट्रीय उद्यान) आणि केरळातील सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यान यांसारख्या महत्त्वाच्या पक्षी अधिवासांचे संरक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत होते. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना १९५८ मध्ये पद्मभूषण आणि १९७६ मध्ये पद्मविभूषण असे भारताचे सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आले. जायकवाडी धरण: आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे पक्षी अभयारण्य शहरापासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर, पैठणजवळ, जायकवाडी धरण आहे, गोदावरी नदीवरील महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या धरणांपैकी एक. धरणाच्या शेजारी जायकवाडी पक्षी अभयारण्य आहे, जे जवळपास २५० प्रकारच्या पक्ष्यांचे घर आहे, ज्यात ७० पेक्षा जास्त प्रकारचे स्थलांतरित पक्षी आहेत. यापैकी ४५ प्रजाती आंतरराष्ट्रीय स्थलांतरित आहेत. अभयारण्याची बेटे आणि उथळ पाणी फ्लेमिंगो, निळकंठ, बगळे, बगळे, सारस, बदके, हंस आणि चोचीवाले पक्षी यांसाठी आदर्श अधिवास पुरवतात. उल्लेखनीय स्थलांतरित पाहुण्यांमध्ये क्रेन, ब्राह्मणी बदके, पोचर्ड, टील, पिनटेल, विगेओन, शोवेलर, गॉडविट आणि ग्लॉसी इबिस यांचा समावेश आहे. दर हिवाळ्यात २०० पेक्षा जास्त प्रजातींचे हजारो पक्षी या जलाशयाला भेट देतात. अभयारण्याचे व्यवस्थापन महाराष्ट्र वनविभाग करते, जे नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करण्यासाठी आणि पक्षी प्रजातींचे रक्षण करण्यासाठी कार्य करते. तथापि, धरणातील बदलत्या पाण्याच्या पातळीने कधीकधी पक्ष्यांच्या अधिवासांवर परिणाम झाला आहे, ज्यामुळे संवर्धनवाद्यांनी चांगल्या पाणी व्यवस्थापनाची मागणी केली आहे. सलीम अली तलाव: आपल्या शहरातील जिवंत श्रद्धांजली छत्रपती संभाजीनगरात (पूर्वीचे औरंगाबाद) आपल्याला या महान पक्षीशास्त्रज्ञाच्या नावाने एक तलाव आहे "सलीम अली तलाव" (सलीम अली सरोवर). शहराच्या वायव्य भागात स्थित असलेला हा उथळ तलाव आणि त्याचे चिखलमय परिसर १५० पेक्षा जास्त प्रकारच्या स्थानिक आणि स्थलांतरित जलपक्ष्यांना आकर्षित करतात, ज्यात फ्लेमिंगो, रंगीत बगळे, चोचीवाले पक्षी, जांभळे बगळे, खंड्या, बदके, पाणकोंबडी इत्यादी, यांचा समावेश आहे. हिवाळ्यात, सायबेरिया आणि मध्य आशियापासून दूरवरून स्थलांतरित पक्षी येथे येतात, ज्यामुळे हे पक्षीनिरीक्षकांसाठी स्वर्ग बनते. तलावात एक छोटे पक्षी अभयारण्य देखील आहे आणि ते शालेय मुले आणि निसर्गप्रेमींना जैवविविधता आणि संवर्धनाबद्दल शिकवण्यासाठी एक शैक्षणिक केंद्र म्हणून काम करते. तथापि, सध्याची स्थिती चिंताजनक आहे. दुर्दैवाने, जलपर्णीचा जास्त प्रादुर्भाव, गटारपाण्याचा थेट निचरा, तलावाच्या काठावरील अतिक्रमण आणि सुरक्षा रक्षकांच्या अनुपस्थितीमुळे तलावाचे सौंदर्य आणि पक्षीजीवन गंभीर धोक्यात आले आहे. अलीकडेच विभागीय आयुक्तांनी तलावाची अचानक पाहणी करून या समस्यांबद्दल चिंता व्यक्त केली आणि महापालिकेला तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. ४ कोटी रुपयांच्या सौंदर्यीकरणानंतरही परिसर जीर्णझीर्ण झाला असून, ६० फूट उंचीचा पक्षीनिरीक्षण बुरुज आता स्वतःच धोका निर्माण करत आहे. न्यायालयीन निर्देशांमुळे तलाव परिसर नागरिकांसाठी बंद आहे, पण महापालिकेने तो पुन्हा खुला करण्यासाठी पावले उचलली आहेत. यासाठी तातडीने जलपर्णी काढणे, गटारपाणी थांबवणे, अतिक्रमण काढणे, सुरक्षा व्यवस्था बळकट करणे आणि पायाभूत सुविधांची दुरुस्ती आवश्यक आहे. सुखना आणि खाम नद्या: शहरी जलमार्ग आणि पक्षीजीवन शहरात, सुखना नदी आणि खाम नदी छत्रपती संभाजीनगरातून वाहतात, ज्या पक्ष्यांसाठी लहान पण महत्त्वाचे अधिवास पुरवतात. या नद्या आणि त्यांच्या काठावर खंड्या, वाघळे, बगळे, चिखल्या आणि विविध पक्षी आकर्षित होतात. विशेषतः खाम नदीवर अलीकडील वर्षांत पुनर्संचयनाचे प्रयत्न झाले आहेत, ज्यात पाणी स्वच्छ करणे, देशी वनस्पती लावणे आणि नागरिकांसाठी चालण्याचे मार्ग तयार करणे यांचा समावेश आहे. या शहरी जलमार्ग, जर योग्यरित्या राखले तर, तुटलेल्या अधिवासांना जोडणारे मार्ग बनू शकतात आणि शहरातील पक्षी संख्येला पाठिंबा देऊ शकतात. पक्षी का महत्त्वाचे आहेत? पक्षी केवळ पाहण्यासाठी सुंदर प्राणी नाहीत, ते पर्यावरणीय आरोग्याचे महत्त्वाचे सूचक आहेत. ते फुलांचे परागीकरण करतात, बिया पसरवतात, कीटक लोकसंख्या नियंत्रित करतात आणि पर्यावरणीय संतुलन राखतात. पक्षी संख्येतील घट बहुतेकदा प्रदूषण, अधिवास नष्ट होणे आणि हवामान बदल यांसारख्या व्यापक पर्यावरणीय समस्यांचे संकेत देते. पक्ष्यांचे संरक्षण म्हणजे त्यांच्यावर अवलंबून असलेल्या परिसंस्थांचे संरक्षण आणि अंतिमतः, आपले स्वतःचे संरक्षण. पक्षीजीवनासमोरील धोके आपल्या शहरात आणि आसपास पक्ष्यांना अनेक व्हानांचा सामना करावा लागतो. शहरीकरण आणि बांधकामामुळे अधिवास नष्ट होणे घरटे आणि अन्न शोधण्याची जागा कमी करते. गटारपाणी, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक प्रवाहामुळे जलस्रोत दूषित होतात. वीज तारा आणि काचेच्या इमारतींमुळे पक्ष्यांना त्रास होतो. हवामान बदलामुळे स्थलांतर आणि अन्न उपलब्धता बदलते. शिकारी आणि बेकायदेशीर वन्यजीव व्यापारामुळे काही प्रजातींना अधिक धोका मोण होतो. आपण काय करू शकतो? पक्ष्यांचे संरक्षण छोट्या कृतींपासून सुरू होते. आपण आपले परिसर स्वच्छ ठेवू शकतो आणि जलस्रोतांजवळ कचरा टाकणे टाळू शकतो. आपण पक्ष्यांसाठी अन्न आणि आश्रय पुरवणारी देशी झाडे आणि झुडपे लावू शकतो. आपण आपल्या बागेत कीटकनाशके वापरणे टाळू शकतो. उन्हाळ्यात पक्ष्यांना पिण्यासाठी पाण्याचे भांडे बाहेर ठेवू शकतो. आपण पक्षीनिरीक्षण कार्यक्रमांमध्ये आणि eBird सारख्या नागरिक विज्ञान कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतो. आपण पक्षी संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना पाठिंबा देऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आपण मुलांना पक्ष्यांचे महत्त्व शिकवू शकतो आणि पुढील पिढीच्या संवर्धनवाद्यांना प्रेरणा देऊ शकतो. कृतीचे आवाहन डॉ. सलीम अली यांच्या जयंतीनिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना, त्यांनी इतक्या प्रेमाने पाहिलेल्या पक्ष्यांचे संरक्षण करून त्यांचा वारसा जपूया. सलीम अली तलाव स्वच्छ करण्यासाठी, खाम आणि सुखना नद्या पुनर्संचयित करण्यासाठी आणि जायकवाडीचे पक्षी अभयारण्य जतन करण्यासाठी आपण एकत्र काम करूया. आपले शहर पक्ष्यांसाठी एक स्वर्ग बनवूया. "गाणारी प्रत्येक चिमणी, आकाशात झेपावणारा प्रत्येक सारस आणि पाण्यात सूर मारणारा प्रत्येक खंड्या आपल्याला एका अमूल्य सत्याची आठवण रून देतो, की निसर्गातील हे सौंदर्य जपणे ही आपली जबाबदारी आहे."

डॉ. निलेश बजरंग पाखरे,
सहाय्यक प्राध्यापक, प्राणिशास्त्र विभाग, देवगिरी महाविद्यालय (स्वायत्त), छत्रपती संभाजीनगर

जिंतूर महसूल चा कारभार पगार शासनाची व दुकानदारी खाजगी चालते

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर तालुक्यातील तलाठी मुख्यालयी राहत नसल्याचा आरोप आता कागदोपत्री सिद्ध झाला आहे. मंडळ अधिकारी, जिंतूर श्री. पठाण यांनी दिलेल्या अहवालातच ही धक्कादायक माहिती समोर आली आहे.मंडळ अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे तालुक्यातील एकूण 48 तलाठ्यांपैकी जिंतूर, बोरी, कुंभारी वगळता उर्वरित 45 तलाठी मुख्यालयी न राहता जिंतूर तहसील कार्यालयाच्या मागील बाजूस कार्यालय थाटून तेथूनच कारभार चालवतात.भाजप परभणी जिल्हा व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप सोपानराव कोकडवार यांनी हीच बाब तहसीलदारांच्या निदर्शनास दहा महिण्या पूर्वी आणून दिली होती. तलाठी आपल्या सज्जात जात नसल्याने शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना 7/12, फेरफार, वारस नोंद यांसारख्या कामांसाठी जिंतूरला हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार आहे.या तक्रारीची दखल घेत तहसीलदार शितल कच्छवे यांनी पहिल पत्र 14/1/2026 रोजी दिल पण कार्यावही न झाल्याने दि. 5.10.2026 रोजी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच दि. 6.10.2026 रोजी उपविभागीय अधिकारी, जिंतूर यांना पत्र पाठवून पाठपुरावा केला आहे.तहसीलदारांनी यापूर्वी दि. 14.01.2026 व दि. 20.03.2026 रोजीही आदेश देऊनही अहवाल सादर झाला नव्हता, असे पत्रात नमूद आहे.कोकडवार यांनी 7 दिवसात मंडळ अधिकाऱ्यांकडून लेखी खुलासा घेऊन अहवाल सादर करावा, अहवाल न दिल्यास मंडळ अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करावी आणि दोषी तलाठ्यांवर विभागीय चौकशी करून निलंबन करावे, अशी मागणी केली आहे. 15 दिवसात कार्यवाही न झाल्यास जिल्हाधिकारी, परभणी व विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे तक्रार करणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यातील बंद असलेली सर्व सहा डायलिसिस सेंटर्स पूर्ववत सुरू

बीड (भगवंत पाळवदे) : बीड जिल्ह्यातील सहा तालुक्यांमध्ये प्रधानमंत्री नॅशनल डायलिसिस प्रोग्राम अंतर्गत चालवली जाणारी आणि मागील काही दिवसांपासून बंद असलेली सर्व सहा डायलिसिस सेंटर्स प्रशासनाच्या तत्परतेने आता पूर्ण क्षमतेने पूर्ववत सुरू करण्यात आली आहेत. महा डायलिसिस एजन्सीच्या थकीत बिलांच्या प्रश्नामुळे ही सेवा खंडित झाली होती. यासंदर्भात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सादिक बाबामिया इनामदार यांनी प्रशासनाला निवेदन देऊन सेंटर्स तातडीने सुरू करण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला होता. रुग्णांची गैरसोय आणि सदर निवेदनाची गंभीर दखल घेत प्रशासनाने वरिष्ठ पातळीवर तातडीने कार्यवाही करून ही सर्व सेंटर्स पुन्हा सुरू केली आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्यातील 110 पेक्षा अधिक गंभीर किडनी विकारग्रस्त रुग्णांची नियमित डायलिसिस सेवा सुरळीतपणे सुरू झाली असून त्यांची प्रवासाची आणि उपचारांची मोठी गैरसोय टळली आहे. प्रशासनाने या अनुषंगाने सर्व मागण्यांची योग्य ती दखल घेतली असल्याने संबंधितांनी आपले आंदोलन स्थगित करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे अधिकृत पत्र जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश सोळंके यांच्या कार्यालयाकडून देण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधित रुग्णांनी या पूर्ववत झालेल्या डायलिसिस सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ नोव्हेंबर २०२६

कन्नड तालुक्यातील साखरवेल येथे तिफण स्नेहमेळावा उत्साहात संपन्न



कन्नड : कन्नड तालुक्यातील मौजे साखरवेल येथे आज तिफण स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. शेतकरी, शिक्षक, साहित्यिक, पत्रकार, युवक आणि महिला मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित होते.तिफण मासिकाने गेली अनेक वर्षे ग्रामीण माती, शेतकरी आणि साहित्य यांना जोडण्याचे काम केले आहे. त्याच कार्याचा एक भाग म्हणून हा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. गावाच्या मातीचा गंध, शेतकऱ्याच्या कष्टाची कहाणी आणि कवीच्या मनातील भावना या तिन्हींचा संगम या मेळाव्यात पाहायला मिळाला.शेतकरी संवादमेळाव्याची सुरुवात शेतकरी संवादाने झाली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी, पावसाची अनिश्चितता, शेतीमालाला मिळत नसलेला भाव, मजुरांची टंचाई आणि तरुण पिढीचा शेतीकडे कमी होत चाललेला कल यावर मनमोकळेपणाने मते मांडली. आपला परिचय करून दिला. आगामी काळात कवी, लेखक शेतकऱ्यांच्या न्याय हक्काच्या लढाईत लक्षणीय योगदान देतील. तसेच तालुक्यातील धार्मिक, ऐतिहासिक, पर्यटन स्थळे असणाऱ्या गावात तिफण काव्य दिंडी उपक्रमाचे आयोजन केले जाईल. वाचन संस्कृतीसाठी वाचन कट्टे सुरू केली जाईल. शाळेत व गावात साहित्यिक उपक्रम होतील. नवलेखकासाठी कार्यशाळा होतील. प्रकाशित पुस्तकावर चर्चासत्र आयोजित केले जाईल. असे संकल्प यावेळी करण्यात आले. त्यातून साहित्य चळवळीला पुढची दिशा मिळेल.मान्यवरांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शेती ही केवळ व्यवसाय नाही, तर ती आपली संस्कृती आहे. आधुनिक तंत्रज्ञान, शेतीपूरक उद्योग आणि सामूहिक प्रयत्न यातूनच शेतकऱ्याचे जीवनमान उंचावेल. शेतकऱ्याने केवळ पिकवणारा न राहता, आपल्या मालाचा भाव ठरवणारा झाला पाहिजे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.'मौनाक्षर' पुस्तकाचे प्रकाशन - मेळाव्याचे आकर्षणया मेळाव्यातील सर्वात भावस्पर्शी क्षण म्हणजे साखरवेल येथील नंदू घुगे यांची मुलगी कु. गायत्री घुगे हिच्या 'मौनाक्षर' या कविता पुस्तकाचे प्रकाशन.गायत्री ही ग्रामीण भागातील नवोदित कवयित्री. तिच्या कवितांमध्ये न बोलता मनात साठलेले भाव, आईची माया, गावाची ओढ, शेतकऱ्याचे कष्ट आणि तरुण मनातील स्वप्नं यांचे दर्शन घडते. 'मौनाक्षर' म्हणजे न बोललेली अक्षरे — मनातल्या मनात राहिलेली भावना. या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बोलताना मान्यवरांनी गायत्रीचे कौतुक केले. "ग्रामीण भागातील मुलीने एवढ्या लहान वयात कवितेचे पुस्तक लिहिणे, ही अभिमानाची गोष्ट आहे. तिच्या लेखणीला बळ मिळावे, यासाठी सर्वांनी तिला प्रोत्साहन दिले पाहिजे," असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. गायत्रीच्या - वडिलांचा नंदकिशोर घुगे यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. संपूर्ण साखरवेल गाव व परिसरातील शेतकरी तिच्या या यशाने भारावून गेले होते.कविसंमेलनाने रंगत वाढवलीप्रकाशनानंतर ज्ञानेश्वर गायके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेले कविसंमेलन हे मेळाव्याचे आणखी एक आकर्षण ठरले. तालुक्यातील लक्ष्मण वाल्डे, भिमराव सोनवणे, समृद्धी गायकवाड, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड, सुरेश औटे, दत्ता मोरस्कर, डॉ. संजय गायकवाड, इम्रान शेख, प्रविण दाभाडे यांच्यासह अनेक कविंनी अनेक कवींनी आपल्या कविता सादर केल्या. शेती, पाऊस, आई, गाव, मायबोली, तरुणाई आणि समाजातील वास्तव यावरच्या कवितांनी उपस्थितांची मने जिंकली. टाळ्यांच्या कडकडाटात प्रत्येक कवितेचे स्वागत झाले.मान्यवरांची उपस्थितीया मेळाव्यास कन्नड तालुक्याचे माजी आमदार श्री. हर्षवर्धन दादा जाधव, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. विजय भोसले, भगवानगड मेहेगावचे महंत कृष्णानंद महाराज, जि. प. सदस्य मा. केतन भैय्या काजे, घाटमाथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. गणेश घुगे, मा. ॲड. कृष्णा जाधव, उद्योजक डी. एम. घुगे साहेब, मा. डॉ. अंबादास सगट, मा. देविदास काळे, मा. डॉ. संजय गायकवाड, मा. डॉ. रामचंद्र झाडे, मेळाव्याचे निमंत्रक गजानन घुगे , प्रभत शेळके,चंद्रकांत मुगले, कृष्णा घुगे, किशोर घुगे, प्रविण दाभाडे यांच्यासह तालुक्यातील शेतकरी, शिक्षक, साहित्यिक, पत्रकार, युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व मान्यवरांनी तिफण मासिकाच्या कार्याचे कौतुक केले. तिफण हे केवळ मासिक नसून ते गावागावातील माणसांना जोडणारे व्यासपीठ आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.स्नेह, साहित्य आणि शेती या तिन्हींचा संगम असलेला हा मेळावा साखरवेल गावासाठी अविस्मरणीय ठरला. गावकऱ्यांनी पाहुण्यांचे मनापासून स्वागत केले. चहा-पाण्यापासून ते जेवणापर्यंत सर्व व्यवस्था गावकऱ्यांनी प्रेमाने केली.

रोटरी क्लबतर्फे मतिमंद बालगृहातील मुलांना दिवाळी फराळाचे वाटप



मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने एकुरगावाडी (ता. उमरगा) येथील ज्ञानदेव शिक्षण प्रसारक मंडळ, कदेर संचलित 'तुळजाभवानी अपंग मतिमंद अनाथ मुलांचे बालगृह' येथे गुरुवारी (ता. 12) रोजी दीपावलीनिमित्त फराळाचे वाटप करण्यात आले. या संवेदनशील उपक्रमाने बालगृहातील विशेष मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर उमटवली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी होते. प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील सेवानिवृत्त मुख्य संशोधक सूत्रय्या स्वामी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, मुख्याध्यापक गोविंद शिंदे, रोटरियन मल्लिकार्जुन बदोले, संत निरंकारी मंडळाचे हनुमंत मंडले, प्रा. हर्षद बदोले व संपूर्ण बदोले परिवार उपस्थित होता.प्रास्ताविक व मनोगत व्यक्त करताना प्रा. डॉ. महेश मोटे यांनी, कै. धनाप्पा इरणप्पा बदोले यांच्या स्मरणार्थ बदोले परिवाराने जपलेल्या सामाजिक बांधिलकीबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात कल्लय्या स्वामी यांनी, हा स्तुत्य उपक्रम संपूर्ण समाजाला प्रेरणा देणारा असल्याचे सांगितले.निरागस संवाद आणि विद्यार्थ्यांची कलाकुसरया सदिच्छा भेटीदरम्यान पाहुण्यांनी मुलांसोबत काही वेळ घालवून त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. या वेळी मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून पाहुणे व उपस्थित भारावून गेले. पाहुणे घरी आल्यावर जसा आनंद होतो, अगदी तसाच आनंद मुलांना झाला होता. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी आपल्या कला आणि कौशल्यातून बनवलेल्या विविध साहित्यकृतींचे प्रदर्शन उपस्थितांना दाखवले, ज्यांच्या कल्पकतेचे सर्वमान्य कौतुक झाले. विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन उपस्थित पाहुण्यांचा सत्कार केला.या भेटीमुळे मुलांमध्ये एक नवा उत्साह संचारला असून, आपल्यालाही समाजाचा एक महत्त्वाचा भाग असल्याचा दिलासा त्यांना मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर जाधव तर आभार गजानन शेवाळे यांनी मानले. या वेळी बालगृहाचे कर्मचारी उपस्थित होते.



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ नोव्हेंबर २०२६

बालपण फुलवू या : समृद्ध भविष्य घडवू या - डॉ. राजेंद्र बगाटे

बालपण हा मानवी जीवनातील सर्वांत सुंदर, निरागस आणि संवेदनशील काळ असतो. या काळात मुलांच्या मनावर उमटणारे संस्कार, त्यांना मिळणारे अनुभव, शिक्षण, प्रेम, सुरक्षितता आणि प्रोत्साहन त्यांच्या संपूर्ण आयुष्याची दिशा ठरवतात. प्रत्येक बालकाच्या मनात असंख्य स्वप्ने असतात. कोणाला डॉक्टर व्हायचे असते, कोणाला शिक्षक, शास्त्रज्ञ, कलाकार, खेळाडू, तर कोणाला समाजासाठी काहीतरी वेगळे करून दाखवायचे असते. या स्वप्नांना आकार देण्याची जबाबदारी केवळ पालकांची किंवा शिक्षकांची नसून संपूर्ण समाजाची आहे. बालकांना आनंदी, सुरक्षित, निरोगी आणि सन्मानपूर्ण बालपण मिळाले, तरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. म्हणूनच बालपण फुलविणे म्हणजे केवळ मुलांचे संगोपन करणे नव्हे, तर संवेदनशील, समताधिष्ठित आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीचा पाया मजबूत करणे होय.भारतात दरवर्षी 14 नोव्हेंबर हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस बालदिन म्हणून ओळखला जातो. मुलांविषयी त्यांना विशेष जिव्हाळा होता. मुलांमध्ये देशाचे भविष्य पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे त्यांच्या जन्मदिनी बालदिन साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. बालदिन हा केवळ उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा मनोरंजनाचा दिवस नाही; तर बालकांचे हक्क, त्यांच्या समस्या, शिक्षणाच्या संधी, आरोग्य, पोषण, सुरक्षितता आणि विकास यांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. बालकांविषयी समाजाची भूमिका किती संवेदनशील आहे आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण काय करीत आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याची ही संधी आहे.बालक हे समाजाचे केवळ भविष्य नसून वर्तमानाचाही महत्त्वाचा भाग आहेत. त्यांच्याकडे स्वतंत्र विचार, भावना, कल्पनाशक्ती आणि व्यक्तिमत्त्व असते. त्यामुळे मुलांना केवळ मोठ्यांच्या अपेक्षांनुसार घडविण्याऐवजी त्यांच्या क्षमता, आवडी आणि नैसर्गिक गुणांना वाव देणे आवश्यक आहे. प्रत्येक मूल वेगळे असते. काही मुले अभ्यासात प्रगती करतात, काही क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काहींची कलात्मक अभिव्यक्ती, निरीक्षणशक्ती किंवा नेतृत्वक्षमता विशेष असते. सर्व मुलांची तुलना एकाच निकषावर करणे अन्यायकारक आहे. मुलांच्या क्षमतांची ओळख करून त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देणे ही पालक, शिक्षक आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.बालपणाचा सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे प्रेम, जिव्हाळा आणि सुरक्षितता. मुलांना केवळ अन्न, वस्त्र आणि निवारा मिळणे पुरेसे नाही; त्यांना भावनिक आधार, आपुलकी, संवाद आणि स्वीकाराचीही गरज असते. घरातील वातावरण प्रेमळ, संवादपूर्ण आणि विश्वासाचे असेल, तर मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो. उलट सततची भीती, अपमान, मारहाण, दुर्लक्ष, तुलना आणि अवास्तव अपेक्षा यांमुळे त्यांच्या मनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. मुलांनी चुका केल्या, प्रश्न विचारले किंवा एखाद्या गोष्टीत अपयश आले, तरी त्यांना समजून घेणे आवश्यक आहे. चुका म्हणजे शिकण्याची संधी आणि अपयश म्हणजे नव्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा, ही जाणीव बालपणापासून निर्माण झाली पाहिजे.शिक्षण हा बालकांच्या सर्वांगीण विकासाचा मूलभूत अधिकार आणि प्रभावी मार्ग आहे. शिक्षणामुळे मुलांना ज्ञान मिळते, विचार करण्याची क्षमता विकसित होते आणि समाजातील विविध प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहता येते. शिक्षण हे केवळ परीक्षेत गुण मिळविण्याचे किंवा नोकरी मिळविण्याचे साधन नाही. ते व्यक्तीला स्वावलंबी, विवेकी, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक बनविण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण, समावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळणे आवश्यक आहे. आर्थिक परिस्थिती, जात, धर्म, भाषा, लिंग, भौगोलिक स्थान किंवा दिव्यांगत्व यांमुळे कोणत्याही बालकाला शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये. शिक्षणातील समान संधी ही केवळ घटनात्मक संकल्पना नसून सामाजिक न्यायाची महत्त्वाची अट आहे.शिक्षणाच्या संधींबरोबरच बालकांचे आरोग्य आणि पोषण यांनाही तितकेच महत्त्व आहे. निरोगी शरीर आणि प्रसन्न मन यांशिवाय मुलांचा सर्वांगीण विकास शक्य नाही. बालकांना सकस आहार, स्वच्छ पिण्याचे पाणी, नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण आणि स्वच्छ परिसर मिळणे आवश्यक आहे. कुपोषण, रक्तक्षय, संसर्गजन्य आजार आणि आरोग्यविषयक सुविधांचा अभाव या समस्या आजही अनेक बालकांच्या विकासात अडथळे निर्माण करतात. विशेषतः ग्रामीण, आदिवासी, दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांतील मुलांना आरोग्यसेवा सहज उपलब्ध होणे गरजेचे आहे. शाळांमधील आरोग्य तपासणी, पोषण आहार, स्वच्छतागृहे आणि आरोग्यविषयक जनजागृती यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. बालकांचे आरोग्य ही कुटुंबाची खासगी बाब नसून सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक विकासाशी निगडित बाब आहे.बालकांच्या विकासामध्ये कुटुंब आणि शाळा या दोन संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कुटुंब मुलांना प्राथमिक संस्कार, मूल्ये आणि सामाजिक वर्तन शिकवते, तर शाळा त्यांना ज्ञान, शिस्त, सहकार्य, नेतृत्व आणि सामाजिक जाणीव प्रदान करते. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकविणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्यातील सुप्त गुण ओळखणे आणि आत्मविश्वास वाढविणे ही शिक्षकांची महत्त्वाची कामे आहेत. शिक्षणपद्धतीत पाठांतरापेक्षा अनुभवाधारित शिक्षण, प्रयोगशीलता, चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्त्व दिले पाहिजे. मुलांना प्रश्न विचारण्याचे, स्वतःचे मत मांडण्याचे आणि नव्या कल्पना मांडण्याचे स्वातंत्र्य मिळाले, तर त्यांची विचारशक्ती अधिक विकसित होईल.बालकांच्या आनंदी बालपणासाठी खेळ, कला, संगीत, वाचन आणि निसर्गाशी संवाद यांना विशेष स्थान असले पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक वातावरणात मुलांच्या वेळापत्रकात अभ्यासवर्ग, परीक्षा, स्पर्धा आणि विविध प्रशिक्षणांचे प्रमाण वाढत आहे. या सगळ्यात मुक्तपणे खेळणे, मित्रांसोबत वेळ घालविणे, गोष्टी ऐकणे, चित्रे काढणे आणि निसर्गाचे निरीक्षण करणे यांसाठी वेळ उरत नाही. प्रत्यक्षात खेळामुळे शारीरिक क्षमता वाढते, संघभावना निर्माण होते, नियमांचे पालन करण्याची सवय लागते आणि पराभव स्वीकारण्याची मानसिक तयारी होते. कला आणि संगीतामुळे भावनांना अभिव्यक्ती मिळते, तर वाचनामुळे कल्पनाशक्ती आणि भाषिक कौशल्ये विकसित होतात. म्हणून बालपण केवळ गुणांच्या स्पर्धेत अडकवून ठेवू नये. मुलांना खेळण्यासाठी मोकळी मैदाने, वाचनालये, क्रीडासाहित्य आणि सांस्कृतिक उपक्रम उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.भारतीय समाजात आजही बालकांच्या विकासासमोर अनेक सामाजिक आणि आर्थिक आव्हाने आहेत. गरिबी, बेरोजगारी, स्थलांतर, कुटुंबातील अस्थिरता, बालमजुरी, बालविवाह, कुपोषण आणि शिक्षणातील गळती यांचा मुलांच्या बालपणावर विपरीत परिणाम होतो. अनेक मुलांना शिक्षण घेण्याच्या वयात काम करावे लागते. काही मुले हॉटेल, कारखाने, वीटभट्ट्या, शेतमजुरी आणि घरगुती कामांमध्ये गुंतलेली दिसतात. काही बालके पालकांच्या स्थलांतरामुळे नियमित शिक्षणापासून दूर जातात. बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून बालकांच्या हक्कांचे उल्लंघन आणि त्यांच्या विकासाच्या संधींचा संकोच आहे. प्रत्येक बालकाला शिक्षण, खेळ, विश्रांती आणि सुरक्षित वातावरण मिळाले पाहिजे. बालमजुरी रोखण्यासाठी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, गरजू कुटुंबांना आर्थिक व सामाजिक आधार आणि मुलांच्या शिक्षणातील सातत्य यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.बालकांच्या बाबतीत मुलगा आणि मुलगी असा भेदभाव करणे ही सामाजिक प्रगतीला बाधा आणणारी वृत्ती आहे. अनेक कुटुंबांमध्ये आजही मुलांच्या शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जाते, तर मुलींच्या शिक्षणाकडे दुय्यम दृष्टीने पाहिले जाते. मुलींवर घरकामाची जबाबदारी टाकणे, त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण करणे किंवा लहान वयात विवाह लावून देणे या प्रवृत्ती त्यांच्या स्वप्नांना मर्यादा घालतात. मुलींना शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षितता आणि निर्णयस्वातंत्र्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे मुलांनाही संवेदनशीलता, सहकार्य, समानता आणि स्त्री-पुरुष समानतेची मूल्ये शिकविणे आवश्यक आहे. लिंगभेदमुक्त बालपणातूनच समताधिष्ठित समाजाची निर्मिती होऊ शकते.बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आज अधिक गंभीर बनला आहे. शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषण, हिंसा, छळ, भेदभाव आणि दुर्लक्ष यांपासून मुलांचे संरक्षण करणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. घर, शाळा, सार्वजनिक ठिकाणे आणि डिजिटल माध्यमे या सर्व ठिकाणी बालकांची सुरक्षितता सुनिश्चित झाली पाहिजे. मुलांना त्यांच्या शरीराविषयी योग्य वयानुरूप माहिती देणे, चांगला आणि अयोग्य स्पर्श यातील फरक समजावून सांगणे, अडचणीच्या प्रसंगी विश्वासू व्यक्तीशी संवाद साधण्यास प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. मुलांनी आपल्यासमोर एखादी समस्या मांडली, तर त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून त्यांना दोष न देता मदत केली पाहिजे. बालकांच्या तक्रारी गांभीर्याने घेणारी आणि त्यांना न्याय व संरक्षण देणारी यंत्रणा सक्षम असणे आवश्यक आहे.डिजिटल युगाने बालकांसमोर संधींचे नवे विश्व खुले केले आहे. संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ज्ञान मिळविणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि सर्जनशीलता विकसित करणे अधिक सुलभ झाले आहे. मात्र, तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, सामाजिक माध्यमांचे व्यसन, ऑनलाइन फसवणूक, सायबर छळ, अयोग्य आशय आणि वैयक्तिक माहितीच्या गैरवापराचे धोकेही वाढले आहेत. त्यामुळे मुलांना तंत्रज्ञानापासून दूर ठेवण्याऐवजी त्याचा विवेकी, सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करण्याचे शिक्षण देणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांच्या डिजिटल वापरावर केवळ निर्बंध घालण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधावा. वाचन, मैदानी खेळ, प्रत्यक्ष संवाद आणि कौटुंबिक सहवास यांचे महत्त्वही मुलांना पटवून दिले पाहिजे. तंत्रज्ञान हे ज्ञानविकासाचे साधन ठरावे; ते बालपणाचा आनंद हिरावून घेणारे माध्यम बनू नये.समाजातील प्रत्येक बालकाला समान संधी मिळणे म्हणजे सर्व बालकांच्या गरजा सारख्याच आहेत असे मानणे नव्हे. आदिवासी, भटक्या-विमुक्त, स्थलांतरित, अनाथ, रस्त्यावर राहणारी, दिव्यांग आणि विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी काही अतिरिक्त सुविधा आवश्यक असतात. अशा मुलांना मुख्य प्रवाहातील शिक्षण आणि सामाजिक जीवनात सहभागी करून घेण्यासाठी समावेशक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. दिव्यांग बालकांसाठी सुलभ शैक्षणिक सुविधा, आवश्यक सहाय्यक साधने, प्रशिक्षित शिक्षक आणि अडथळामुक्त परिसर उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आदर राखून शिक्षण दिल्यास मुलांना स्वतःच्या ओळखीविषयी अभिमान वाटतो. कोणतेही मूल परिस्थितीमुळे मागे राहू नये, हीच खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाची भूमिका आहे.बालकांमध्ये सामाजिक आणि नैतिक मूल्यांची जडणघडण होणेही तितकेच आवश्यक आहे. प्रामाणिकपणा, सहकार्य, बंधुभाव, समता, सहिष्णुता, पर्यावरणप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्ये बालपणापासून रुजविली पाहिजेत. जात, धर्म, भाषा, प्रदेश आणि आर्थिक स्तर यांवरून भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करण्याची शिकवण मुलांना मिळाली पाहिजे. घरातील आणि शाळेतील वातावरणात समता व परस्पर आदराची मूल्ये प्रत्यक्ष कृतीतून दिसली पाहिजेत. मुलांना केवळ उपदेश करून मूल्यशिक्षण देता येत नाही; तर मोठ्यांच्या वर्तनातून त्यांना त्याची अनुभूती मिळते. पालक, शिक्षक आणि समाजातील जबाबदार व्यक्तींनी स्वतःच्या आचरणातून आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे.बालकांचे भविष्य घडविण्यात शासनाची भूमिकाही महत्त्वाची आहे. शिक्षणाचा अधिकार, बालकांचे संरक्षण, पोषण, आरोग्य, महिला व बालविकासाशी संबंधित योजना आणि बालहक्कांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून मुलांच्या विकासासाठी विविध प्रयत्न केले जातात. मात्र, योजनांची घोषणा पुरेशी नसून त्यांची परिणामकारक अंमलबजावणी महत्त्वाची आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागांपर्यंत शासकीय सुविधा पोहोचल्या पाहिजेत. अंगणवाड्या, शाळा, आरोग्य केंद्रे आणि बालसंरक्षण यंत्रणा यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, पालक संघटना आणि नागरिकांनीही बालविकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. बालकांच्या समस्यांकडे केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न म्हणून न पाहता सार्वजनिक धोरण आणि सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे.बालदिनाच्या निमित्ताने मुलांना भेटवस्तू देणे, मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करणे किंवा शाळांमध्ये विविध स्पर्धा घेणे आनंददायी आहे; परंतु बालदिनाचा खरा अर्थ यापलीकडे आहे. प्रत्येक बालकाला वर्षातील एका दिवसापुरते नव्हे, तर वर्षभर प्रेम, सन्मान, सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य आणि विकासाच्या संधी मिळाल्या पाहिजेत. मुलांच्या मतांना महत्त्व देणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देणे हीच बालदिनाची खरी फलश्रुती ठरू शकते. मुलांना काय व्हायचे आहे, त्यांना कोणत्या अडचणी येतात आणि त्यांना कोणत्या प्रकारच्या मदतीची गरज आहे, हे जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला पाहिजे.आजच्या बालकांच्या हातात उद्याच्या समाजाची सूत्रे असणार आहेत. त्यामुळे त्यांच्या मनात वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि मानवतावादी मूल्ये रुजविणे आवश्यक आहे. हवामान बदल, पाणीटंचाई, प्रदूषण, सामाजिक विषमता आणि तंत्रज्ञानातील वेगवान बदल अशा अनेक आव्हानांना भविष्यातील पिढीला सामोरे जावे लागणार आहे. या आव्हानांचा सामना करण्यासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे ठरणार नाही; तर संवेदनशीलता, कल्पकता, चिकित्सक विचार आणि सामूहिक कृतीची क्षमता विकसित करावी लागेल. मुलांना निसर्गाशी जोडणे, वृक्षारोपण, पाणी बचत, स्वच्छता आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांचा प्रत्यक्ष अनुभव देणे आवश्यक आहे. बालकांना जबाबदार नागरिक बनविण्याची प्रक्रिया त्यांच्या दैनंदिन जीवनातील छोट्या कृतींपासून सुरू होते.शेवटी, बालपण फुलविणे ही केवळ भावनिक संकल्पना नसून सामाजिक परिवर्तनाची मूलभूत अट आहे. बालकांच्या चेहऱ्यावरील हास्य, त्यांच्या मनातील निर्भयता, डोळ्यांतील स्वप्ने आणि कृतीतील आत्मविश्वास हे समाजाच्या प्रगतीचे खरे मापदंड आहेत. ज्या समाजात मुलांना समान संधी, सुरक्षित वातावरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सन्मानाचे जीवन मिळते, तो समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समृद्ध ठरतो. प्रत्येक घराने मुलांसाठी प्रेमळ वातावरण निर्माण करावे, प्रत्येक शाळेने त्यांच्यातील क्षमता विकसित करावी, प्रत्येक गावाने बालमैत्रीपूर्ण परिसर घडवावा आणि शासनाने त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी कटिबद्ध राहावे. बालकांचे बालपण हिरावून न घेता त्यांना मुक्तपणे वाढू देणे, त्यांच्या स्वप्नांना दिशा देणे आणि त्यांच्या क्षमतांना संधी उपलब्ध करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. कारण आज आपण ज्या पद्धतीने बालपण घडवू, त्याच पद्धतीने उद्याचा समाज आकाराला येईल. म्हणूनच बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक संकल्प करायला हवा की बालकांच्या हक्कांचा आदर करू, त्यांच्या स्वप्नांना बळ देऊ, त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेऊ आणि त्यांच्या विकासासाठी सक्रिय योगदान देऊ. बालपण फुलले, तरच भविष्य समृद्ध होईल; आणि प्रत्येक बालक आनंदी झाले, तरच खऱ्या अर्थाने समाज प्रगत होईल.

डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com